**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी व नियत कालमर्यादा अधिसूचित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग , ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक:-मलोह-२०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६.**
मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३ जूलै, २०१५.

वाचा:-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश- २०१५ ( सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ )

प्रस्तावना-

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दिनांक २८/४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवीत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे. सदरहू अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने त्या पुरवीत असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरवीणे आवश्यक आहे.

२. या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखाली उद्योग संचालनालय,मुंबई , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, मुंबई व शासकीय मुद्रण,लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,मुंबई या संस्थांचा समावेश आहे. त्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरीक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त नागरिकांनी फायदा घेतला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम -३ अनुसार अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याअनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

**१)** या शासन निर्णयाच्या सहपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या एकूण १० सेवा विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांनी कलम -३ अनुसार अधिसूचित करावयाच्या आहेत.

**२)** या शासन निर्णयाच्या सहपत्र-ब मध्ये नमूद केलेल्या एकूण ७ सेवा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, मुंबई यांनी कलम- ३ अनुसार अधिसूचित करावयाच्या आहेत.

**३)** या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र-क मध्ये नमूद केलेल्या एकूण २ सेवा शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय यांनी कलम- ३ अनुसार अधिसूचीत करावयाच्या आहेत.

**४)** या शासन निर्णयाच्या सोबतच्या सहपत्रांमधील नमूद केलेल्या सेवा उपलब्ध करून देण्याच्या नियत कालावधीत संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणांना बदल करता येणार नाही.

**५)** या शासन निर्णयामधील सहपत्र **"अ"**, **"ब"** व **"क"** मध्ये नमूद केलेल्या सेवा व्यतिरिक्त नागरिकाना आणखी काही सेवा विशिष्ट कालावधीत पुरवीणे नजिकच्या कालावधीत शक्य होत असल्यास अशा अधिकच्या सेवा कलम-३ अनुसार अधिसूचित करण्याची मुभा सार्वजनिक प्राधिकरणांना देण्यात येत आहे.

**६)** या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्याकरीता आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना मुभा राहील. तसेच संबंधीत सार्वजनिक प्राधिकारणांनी सेवा विचारात घेऊन पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादींमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना सुधारणा करता येईल.

३. राज्यातील उद्योग संचालनालय, मुंबई ,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, मुंबई व शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे कलम-३ अनुसार सेवा अधिसूचित करणे व त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

४. उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी दिनांक २७ जुलै, २०१५ पूर्वी सुरु करण्याची जबाबदारी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०७२३१४४९४१४९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

Suresh Lalji Bhoi

Digitally signed by Suresh Lalji Bhoi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Suresh Lalji Bhoi
Date: 2015.07.27 16:48:46 +05'30'

**( सु. ला. भोई )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत:**

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव.

२) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव.

३) सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

४) सर्व विधानसभा/ विधानपरिषद सदस्य.

५) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.

६) मा. लोकआयुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय.

७) अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग.

८) विकास आयुक्त (उद्योग ) उद्योग संचालनालय, मुंबई.

९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,उद्योग सारथी,मुंबई .

१०) संचालक, शासकीय मुद्रण,लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई.

११ मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी .

१२) प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक.

१३) निवडनस्ती, उद्योग- ६.

**उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:- मलोह-२०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६.**

**सहपत्र-"अ"**

( विकास आयुक्त ( उद्योग ) उद्योग संचालनालय, यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशिल )

| अ. क्र. | लोकसेवेचे नाव | सेवा देण्याचा कालावधी | सेवा पुरविणारा अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | व्दितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत मुद्रांक शुल्क माफीचे प्रमाणपत्र | ७ दिवस | अधिक्षकीय उद्योग अधिकारी/उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/अतिरिक्त उद्योग संचालक |
| २ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र अदा करणे. | ३० दिवस | अधिक्षकीय उद्योग अधिकारी/उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थपक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/अतिरिक्त उद्योग संचालक |
| ३ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदानाच्या दाव्यास मंजुरी. | १५ दिवस | अधिक्षकीय उद्योग अधिकारी/उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/अतिरिक्त उद्योग संचालक |
| ४ | मुंबई कुळ वहिवाट व शेत जमीन कायदा १९४८ सुधारणा १९९४ अंतर्गत खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनांसाठी १० हेक्टरपेक्षा जास्त शेतजमीन खरेदीसाठी आवश्यक असलेली पूर्व परवानगी. | १५ दिवस | उद्योग उपसंचालक | अतिरिक्त उद्योग संचालक | विकास आयुक्त (उद्योग ) |
| ५ | खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना इरादापत्र देणे. | १० दिवस | उद्योग सहसंचालक /उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थपक. | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/अतिरिक्त उद्योग संचालक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | खाजगी माहिती तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे. | ७ दिवस | उद्योग सहसंचालक /उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थपक. | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/अतिरिक्त उद्योग संचालक |
| ७ | खाजगी जैव तंत्रज्ञान उद्यानांना इरादापत्र देणे. | १० दिवस | उद्योग सहसंचालक /उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थपक. | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/अतिरिक्त उद्योग संचालक |
| ८ | खाजगी जैव तंत्रज्ञान घटकांना नोदणी प्रमाणपत्र देणे. | ७ दिवस | उद्योग सहसंचालक /उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थपक. | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/अतिरिक्त उद्योग संचालक |
| ९ | सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रम अंतर्गत उद्योजकांसाठी एंटरप्रायझेस मेमोरँडम भाग-I | २ दिवस | उद्योग निरिक्षक/उद्योग अधिकारी | महाव्यवस्थापक | उद्योग सहसंचालक |
| १० | सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रम अंतर्गत उद्योजकांसाठी एंटरप्रायझेस मेमोरँडम भाग-II | २ दिवस | उद्योग निरिक्षक/उद्योग अधिकारी | महाव्यवस्थापक | उद्योग सहसंचालक |

**********

## उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:- मलोह-२०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६.

### सहपत्र-"ब"

( महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशिल )

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशन अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | व्दितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इमारत नकाशे मंजूरी,अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र. तात्पुरती नळ जोडणी, सांडपाणी नि:स्सारण नकाशे. | ६० दिवस | कार्यकारी अभियंता /उप अभियंता / सहाय्यक रचनाकार /सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ, | संबंधित अधिक्षक, अभियंता. | मुख्य नियोजक, मऔविम. |
| २ | अंतिम अग्निशमन यंत्रणा मंजूरी | ३० दिवस | विभागीय अग्निशमन अधिकारी | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार |
| ३ | इमारत पूर्णत्व प्रमाणपत्र /भोगवटा प्रमाणपत्र | १५ दिवस | कार्यकारी अभियंता /उप अभियंता / सहाय्यक रचनाकार /सहाय्यक वास्तशास्त्रज्ञ, | संबंधित अधिक्षक अभियंता, मऔविमं | मुख्य नियोजक, मऔविम. मुंबई. |
| ४ | कायम पाणी पुरवठा नळ जोडणी | १५ दिवस | उप अभियंता (२०मि.मि.पर्यंत) कार्यकारी अभियंता (२५ मि.मि. पर्यंत) | संबंधित अधिक्षक अभियंता, मऔविमं. | मुख्य अभियंता/ अति.मुख्य अभियंता, मऔविम. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | मुंबई प्रदेश महानगरामधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान उद्योगांना ना हरकत प्रमाणपत्र. | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सह मुख्य कार्यकारी अधिकारी ( माहिती तंत्रज्ञान ) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ६ | मुंबई प्रदेश महानगरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत इरादापत्रे | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सह मुख्य कार्यकारी अधिकारी ( माहिती तंत्रज्ञान ) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ७ | मुंबई महानगर प्रदेशामधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत कंपन्यांची नोंदणी करणे. | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सह मुख्य कार्यकारी अधिकारी ( माहिती तंत्रज्ञान ) | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**********

**उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:- मलोह-२०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६.**

**सहपत्र-"क"**

( शासकीय मुद्रण,लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुबई यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशिल)

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशन अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | व्दितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाणिज्यिक संस्था व खाजगी पक्ष यांनी काढलेल्या अधिसूचना, सूचना व जाहिराती स्विकारून " महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन संकिर्ण सूचना व जाहिराती या राजपत्राच्या भागात प्रसिध्द करणे व ते त्यांना ऑनलाईन व ईमेलवर उपलब्ध करून देणे. | १५ दिवस | कनिष्ठ सहाय्यक व्यवस्थापक , शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई. | सहाय्यक व्यवस्थापक (प्रकाशने) | व्यवस्थापक, शासकीय मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालय मुंबई. |
| २ | महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन-नाव,जन्मतारीख( वय ) आणि धर्म बदलण्याच्या जाहिराती संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन स्विकारून " महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन -नाव, वय व धर्म बदलण्याच्या जहिरातीचा विभाग " या राजपत्राच्या भागात प्रसिध्द करणे व ते नागरिकांना ऑनलाईनव्दारे व ईमेलव्दारे उपलब्ध करून देणे. | १५ दिवस | कनिष्ठ सहाय्यक व्यवस्थापक, (मुंबई,नागपूर व औरंगाबाद विभाग) , अधिक्षक, पुणे विभाग. | सहाय्यक व्यवस्थापक (प्रकाशने, मुंबई) , पुणे नागपूर, सहाय्यक संचालक, औरंगाबाद . | व्यवस्थापक (मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद विभाग) |

**********

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वीतीय अपीलीय अधिकारी व नियत कालमर्यादा अधिसूचित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- मलोह-२०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६**
**मंत्रालय, मुंबई :- ४०० ०३२**
**दिनांक :- २९ नोव्हेंबर, २०१७**

वाचा:- १) शासन निर्णय ,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दि.२३/७/२०१५
२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा दि.२३/११/२०१७ चा प्रस्ताव

**प्रस्तावना:-**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानीक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ दि.२८/४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वीतीय अपीलीय अधिकारी व नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने त्या पुरवित असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील उद्योग संचालनालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, मुंबई व शासकीय मुद्रण, लेखन सामुग्री व प्रशासन संचालनालय, मुंबई या संस्थांकडून देण्यात येणाऱ्या विविध सोयी सुविधांपैकी नागरीक केंद्र बिंदू मानून नागरीकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व महत्वाच्या सेवा अध्यादेशाच्या कलम तीन नुसार दि.२३/७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये अधिसूचित करण्यात आल्या आहेत. प्रस्तूत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांमधील परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या अ.क्र.१ व २ येथील सेवांच्या कालमर्यादेमध्ये बदल करण्याचा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने प्रस्तावित केल्यानुसार प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय दि.२३/७/२०१५ सोबतच्या सहपत्र-ब मध्ये एकूण ७ सेवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, मुंबई यांनी कलम ३ नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. यामध्ये इमारत नकाशे मंजूरी, अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र याकरीता लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा ६० दिवस तसेच अंतिम अग्निशमन यंत्रणा मंजूरी लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा ३० दिवस इतकी नमूद करण्यात आली होती.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उपरोक्त प्रकरणी सशर्त अग्नीशमन ना हरकत प्रमाणपत्रासह इमारत नकाशे मंजूरी करीता ३० दिवस व अंतिम अग्नीशमन यंत्रणा मंजूरी यासाठी १५ दिवस इतका कालावधी लोकसेवा पुरविण्यासाठी विनंती केली होती.सदर विनंतीच्या अनुषंगाने आता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत सशर्त अग्नीशमन ना हरकत प्रमाणपत्रासह इमारत

नकाशे मंजूरी करीता ३० दिवस व अंतिम अग्नीशमन यंत्रणा मंजूरी यासाठी १५ दिवस इतका कालावधी लोकसेवा पुरविण्यासाठी सुधारीत करण्यात येत आहे.

दि.२३/७/२०१५ च्या शासन निर्णयातील सहपत्र अ, ब व क मध्ये नमूद केलेल्या सेवांव्यतिरिक्त नागरीकांना आणखी काही सेवा विशिष्ट कालावधीत पुरविणे नजिकच्या कालावधीत शक्य होत असल्यास अशा अधिकच्या सेवा कलम ३ अनुसार अधिसूचित करण्याची मुभा सार्वजनिक प्राधिकरणांना देण्यात येत आहे.

या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्याकरीता आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना मुभा राहिल. तसेच संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी सेवा विचारात घेवून पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वीतीय अपीलीय अधिकारी इत्यादींमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना सुधारणा करता येईल.

राज्यातील उद्योग संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,उद्योग सारथी , मुंबई व शासकीय मुद्रण, लेखन सामुग्री व प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे कलम ३ अनुसार सेवा अधिसूचित करणे व त्यांची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

उपरोक्त आदेशांची अंमलबजावणी तात्काळ सुरु करण्याची जबाबदारी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१७११२९१७०९५४८८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहें.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Namdeo Kondiba Bhosale

Digitally signed by Namdeo Kondiba Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=IEL Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, serialNumber=8c6a286229ecc7982a08553f49d547ef64be25c7f26fc96324ece7cccbfeb8c5, cn=Namdeo Kondiba Bhosale
Date: 2017.11.29 17:13:18 +05'30'

**(डॉ.ना.कों.भोसले)**
शासनाचे उपसचिव

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव,विधानभवन,मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,विधानभवन,मुंबई.
५) मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,
६) मा.राज्यमंत्री(उद्योग) यांचे खाजगी सचिव
७) मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव,सामान्य प्रशासन विभाग.मंत्रालय,मुंबई.
८) मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त, यांचे कार्यालय
९) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०) अपर मुख्य सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक
११) विकास आयुक्त उद्योग संचालनालय नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर मुंबई.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,उद्योग सारथी , मुंबई.
१३) संचालक , शासकीय मुद्रण, लेखन सामुग्री प्रकाशन संचालनालय,मुंबई
१४) निवडनस्ती (उद्योग-६)

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.मलोह २०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६

सहपत्र - ब

(महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशील)

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वीतीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इमारत नकाशे मंजूरी, सशर्त अग्नीशमन ना हरकत प्रमाणपत्र | ३० दिवस | कार्यकारी अभियंता/ उपअभियंता / सहायक रचनाकार / सहायक वास्तुशास्त्रज्ञ | संबंधित अधिक्षक अभियंता | मुख्य नियोजक, म.औ.वि.मंडळ |
| २ | अंतिम अग्नीशमन यंत्रणा मंजूरी | १५ दिवस | विभागीय अग्नीशमन अधिकारी | उपमुख्य अग्नीशमन अधिकारी | मुख्य अग्नीशमन अधिकारी व अग्नीशमन सल्लागार |
| ३ | तात्पुरती नळ जोडणी, सांडपाणी नि:स्सारण नकाशे | १५ दिवस | कार्यकारी अभियंता/ उपअभियंता / सहायक रचनाकार / सहायक वास्तुशास्त्रज्ञ | संबंधित अधिक्षक अभियंता , म.औ.वि.मंडळ | मुख्य नियोजक, म.औ.वि.मंडळ |
| ४ | इमारत पुर्णत्व प्रमाणपत्र/ भोगवटा प्रमाणपत्र | १५ दिवस | कार्यकारी अभियंता/ उपअभियंता / सहायक रचनाकार / सहायक वास्तुशास्त्रज्ञ | संबंधित अधिक्षक अभियंता, म.औ.वि.मंडळ | मुख्य नियोजक, म.औ.वि.मंडळ |
| ५ | कायम पाणीपुरवठा नळ जोडणी | १५ दिवस | उपअभियंता (२० मि.मी.पर्यंत ) / कार्यकारी अभियंता (२५ मि.मी.पर्यंत) | संबंधित अधिक्षक अभियंता, म.औ.वि.मंडळ | मुख्य अभियंता / अतिरिक्त मुख्य अभियंता म.औ.वि.मं. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | मुंबई प्रदेश महानगरामधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान उद्योगांना ना हरकत प्रमाणपत्र | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सहमुख्य कार्यकारी अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ७ | मुंबई प्रदेश महानगरामधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत इरादा पत्रे | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सहमुख्य कार्यकारी अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ८ | मुंबई प्रदेश महानगरामधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत कंपन्यांची नोंदणी करणे | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सहमुख्य कार्यकारी अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान) | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी व नियत कालमर्यादा अधिसूचित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- मलोह-२०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६.**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ सप्टेंबर, २०१८.

**वाचा :-** शासन निर्णय समक्रमांक दिनांक २३ जुलै, २०१५.

**प्रस्तावना:-**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांना स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी लागु करण्यात आला आहे. या अध्यादेशाचे कलम ३ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागु झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे.

या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखाली उद्योग संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई व शासकीय मुद्रण, लेखनसामुग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई या संस्थांचा समावेश असून त्यांच्या अंतर्गत या अध्यादेशानुसार देण्यात येणाऱ्या विविध सोयी सुविधा अधिसूचित करण्याबाबत दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी शासनाने निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने उद्योग संचालनालय, मुंबई यांच्याकडे असलेल्या १० सेवांपैकी ३ सेवा रद्द करण्याबाबत उद्योग संचालनालयाने प्रस्तावित केले होते.

**शासन निर्णय:-**

उद्योग संचालनालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने उद्योग संचालनालयाच्या खालील नमूद ३ सेवा रद्द करण्याबाबत निर्णय घेतला आहे.

| अनुक्रमांक | सेवाचा तपशील |
|---|---|
| १. | मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन कायदा, १९४८ सुधारणा, १९९४अंतर्गत खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी १० हेक्टर पेक्षा जास्त शेतजमीन खरेदीसाठी आवश्यक असलेली पूर्व परवागनी. |
| २. | सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अंतर्गत उद्योजकांसाठी एन्टरप्रायजेस मेमोरेंडम भाग-I |
| ३. | सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अंतर्गत उद्योजकांसाठी एन्टरप्रायजेस मेमोरेंडम भाग-II |

२. उपरोक्त प्रकरणी उद्योग संचालनालयाने प्रस्तावित केलेल्या ३ सेवा रद्द केल्यानंतर होणारे सुधारित प्रपत्र ( अ, ब व क) सोबत जोडले आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०९१११२४९३८६२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajiv Madhav Ambikar

Digitally signed by Rajiv Madhav Ambikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4afb47d807935092599a3e28024dd3d3c461bada30a950e81e666a02aad578f5, cn=Rajiv Madhav Ambikar
Date: 2018.09.11 12:54:01 +05'30'

**( राजीव आंबीकर )**
कार्यासन अधिकारी

**प्रति :- माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
३. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
५. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन,मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१०. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई .
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१२. शासकीय मुद्रण, लेखनसामुग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१७. वरिष्ठ उप महालेखापाल (पडताळणी) बाह्य लेखा परीक्षा विभाग, मुंबई.
१८. लेखा अधिकारी, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
१९. निवड नस्ती (उद्योग-६).

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:- मलोह-२०१५/प्र.क्र. ७७/उद्योग-६,

सहपत्र-"अ"

(विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशील)

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | सेवा देण्याचा कालावधी | सेवा पुरविणारा अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | व्दितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामुहिक प्रोत्साहन योजना, २०१३ अंतर्गत मुद्रांक शुल्क माफीचे प्रमाणपत्र | ७ दिवस | अधिक्षकीय उद्योग अधिकारी/उद्योग उपसंचालक/महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/ अतिरिक्त उद्योग संचालक |
| २. | सामुहिक प्रोत्साहन योजना, २०१३ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र अदा करणे. | ३० दिवस | अधिक्षकीय उद्योग अधिकारी/उद्योग उपसंचालक/महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/ अतिरिक्त उद्योग संचालक |
| ३. | सामुहिक प्रोत्साहन योजना, २०१३ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदानाच्या दाव्यास मंजूरी. | १५ दिवस | अधिक्षकीय उद्योग अधिकारी/उद्योग उपसंचालक/महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/ अतिरिक्त उद्योग संचालक |
| ४. | खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना इरादापत्र देणे. | १० दिवस | उद्योग सहसंचालक/ उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/ अतिरिक्त उद्योग संचालक |
| ५. | खाजगी माहिती तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे. | ७ दिवस | उद्योग सहसंचालक/ उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/ अतिरिक्त उद्योग संचालक |
| ६. | खाजगी जैव तंत्रज्ञान उद्यानांना इरादापत्र देणे. | १० दिवस | उद्योग सहसंचालक/ उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/ अतिरिक्त उद्योग संचालक |
| ७. | खाजगी जैव तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे. | ७ दिवस | उद्योग सहसंचालक/ उद्योग उपसंचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक/ उद्योग सहसंचालक | विकास आयुक्त (उद्योग)/ अतिरिक्त उद्योग संचालक |

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:- मलोह-२०१५/प्र.क्र. ७७/उद्योग-६,

## सहपत्र-"ब"

## (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई, यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशील)

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | सेवा देण्याचा कालावधी | सेवा पुरविणारा अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | व्दितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | इमारत नकाशे मंजूरी. अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र, तात्पुरती नळ जोडणी, सांडपाणी नि:स्सारण नकाशे | ३० दिवस | कार्यकारी अभियंता/ उपअभियंता/सहाय्यक रचनाकार/ सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ | संबंधित अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. | मुख्य नियोजक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. |
| २. | अंतिम अग्निशमन यंत्रणा मंजूरी. | १५ दिवस | विभागीय अग्निशमन अधिकारी | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार |
| ३. | इमारत पुर्णत्व प्रमाणपत्र/ भोगवटा प्रमाणपत्र. | १५ दिवस | कार्यकारी अभियंता/ उपअभियंता/सहाय्यक रचनाकार/ सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ | संबंधित अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. | मुख्य नियोजक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. |
| ४. | कायम पाणी पुरवठा नळ जोडणी. | १५ दिवस | उपअभियंता (२० मि.मी. पर्यंत), कार्यकारी अभियंता ( २५ मि. मी. पर्यंत) | संबंधित अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. | मुख्य अभियंता/ अतिरिक्त मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. |
| ५. | मुंबई प्रदेश महानगरमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील माहिति तंत्रज्ञान उद्योगांना ना हरकत प्रमाणपत्र. | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (माहिती तंत्रज्ञान. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. |
| ६. | मुंबई प्रदेश महानगरीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील माहिति तंत्रज्ञान कंपन्यांना माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत इरादापत्रे. | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (माहिती तंत्रज्ञान. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. |
| ७. | मुंबई प्रदेश महानगरमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात माहिति तंत्रज्ञान धोरणांतर्गत कंपन्यांची नोंदणी करणे. | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (माहिती तंत्रज्ञान. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. |

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:- मलोह-२०१५/प्र.क्र. ७७/उद्योग-६,

सहपत्र-"क"

(शासकीय मुद्रण, लेखणसामुग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशील)

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | सेवा देण्याचा कालावधी | सेवा पुरविणारा अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | व्दितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | वाणिज्यिक संस्था व खाजगी पक्ष यांनी काढलेल्या अधिसूचना, सूचना व जाहिराती स्विकारून महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-२ संकीर्ण सूचना व जाहिराती या राजपत्राच्या भागात प्रसिध्द करणे व ते त्यांना ऑनलाईन व ईमेलवर उपलब्ध करून देणे. | १५ दिवस | कनिष्ठ सहाय्यक व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई | सहाय्यक व्यवस्थापक (प्रकाशने) | व्यवस्थापक, शासकीय मुद्रण, लेखनसामुग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई |
| २. | महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-२- नाव, जन्मतारीख ( वय) आणि धर्म बदलण्याच्या जाहीराती संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन स्विकारून महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-२- नाव, जन्मतारीख ( वय) आणि धर्म बदलण्याच्या जाहीरातीचा विभाग या राजपत्राच्या भागात प्रसिध्द करणे व ते नागरिकांना ऑनलाईन व ईमेलवर उपलब्ध करून देणे. | १५ दिवस | कनिष्ठ सहाय्यक व्यवस्थापक, (मुंबई, नागपूर व औरंगाबाद विभाग) अधिक्षक पुणे विभाग. | सहाय्यक व्यवस्थापक (प्रकाशने, मुंबई), पुणे, नागपूर, सहाय्यक संचालक, औरंगाबाद. | व्यवस्थापक, (मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद विभाग) |

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी व नियत कालमर्यादा अधिसूचित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक :- मलोह-२०१५/प्र.क्र. ७७ /उद्योग-६.**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ०५ जानेवारी,२०२१.

वाचा : १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५)
२) शासन निर्णय समक्रमांक दि.२३ जुलै,२०१५
३) शासन निर्णय समक्रमांक दि.११ सप्टेंबर,२०१८
४) तांत्रिक सल्लागार तथा नोडल अधिकारी , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांचे जा. क्र. मऔविम/तांस/ डी-१७३९२/२०२० दि.०३ डिसेंबर, २०२० चे पत्र.

**प्रस्तावना:-**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तप्तर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५, दि.२८.४.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम - ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितिय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करून त्याप्रमाणे सेवा पुरवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

२. या विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या शासननिर्णयान्वये विभागामार्फत १९ सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या असून,संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये उद्योग संचालनालयाच्या दि.२३ जुलै,२०१५ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांपैकी ३ सेवा वगळण्यात आलेल्या आहेत.. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी त्यांच्या संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये अतिरिक्त २ सेवा अधिसुचित करण्याची शासनास विनंती केलेली आहे. त्यामुळे या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३ नुसार अधिसूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयाच्या सहपत्र - अ मध्ये नमुद करण्यात आलेल्या २ सेवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ मधील कलम - ३ नुसार अधिसुचित करावयाच्या आहेत.

२. या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्याकरीता आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना मुभा राहील. तसेच संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना सेवा विचारात घेवून पदनिर्देशित अधिकारी , प्रथम अपिलीय अधिकारी , द्वितिय अपिलीय अधिकारी इत्यादींमध्ये सुधारणा करता येईल.

३. तांत्रिक सल्लागार तथा नोडल अधिकारी , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे कलम - ३ अनुसार अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२१०१०६१५५५२५४११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: CN = SANJAY SHANKARRAO INGLE, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Date: 2021.01.06 15:59:17 +05'30'

**( संजय इंगळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१.मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव.
२.मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
३.मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
४.मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
५.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६.सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
७.मा.लोक-आयुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
८.मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
९.विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१०मा.मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी.
११प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक.
१२निवड नस्ती (उद्योग-६).

**उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.मलोह-२०१५/ प्र.क्र.७७/उद्योग - ६, दि. ०५.१.२०२१ चे सहपत्र.**

**सहपत्र - "अ"**

**( महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई , यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशिल )**

| क्र. | सेवेचे नाव | कालावधी | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलिय अधिकारी | द्वितीय अपिलिय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १ अ | ऑनलाईन सरळ पद्धतीने अथवा प्राधान्याने भुखंड वाटप करताना समितीच्या मंजुरीनंतर जागेचे देकारपत्र (offer letter) देणे. | २ दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय ) | संबंधित सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय ) |
| ब | ऑनलाईन निविदा पध्दतीने भुखंडाचे वाटप करताना निविदा उघडणाऱ्या समितीच्या अहवालास मा. मुख्य कार्यकारी यांची मंजुरी प्राप्त अहवाल प्रा.अ. यांना प्राप्त झाल्यावर | २ दिवस वस | प्रादेशिक अधिकारी | संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय ) | संबंधित सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय ) |
| २. | भुखंडाचे वाटप (Allotment letter) पत्र देणे | इसारा रक्कम भरल्यानंतर ७ दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय ) | संबंधित सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय ) |

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी व नियम कालमर्यादा अधिसूचित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- मलोह-२०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६.**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २८ ऑक्टोबर, २०२२.

**वाचा :** १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५)
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र मलोह २०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६, दि.२३/७/२०१५.
३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र मलोह २०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६, दि.११/९/२०१८.
४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र मलोह २०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६, दि.०१/०१/२०२१
५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे पत्र क्र. एमआयडीसी/ एच क्यू/ आयटी सेल/ २०२२/ डी ५३७०५, दि. २१/१०/२०२२

**प्रस्तावना:-**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५, दि.२८/४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करून त्याप्रमाणे सेवा पुरविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

२. विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये विभागामार्फत १९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून, संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये उद्योग संचालनालयाच्या दि.२३/०७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांपैकी ३ सेवा वगळण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये उद्योग संचालनालयाच्या अतिरीक्त ९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या संदर्भ क्र.५ येथील पत्रान्वये त्यांची दि.२३/०७/२०१५ च्या शासन निर्णयातील सहपत्र “ब” मधील अनुक्रमांक १ येथील अधिसूचित केलेल्या सेवेचा कालावधीमध्ये बदल करण्याबाबत विनंती केली आहे. महामंडळाच्या विनंतीच्या अनुषंगाने बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रस्तावानुसार संदर्भ क्र.२ येथील दि.२३/०७/२०१५ च्या शासन निर्णयानुसार पुढ़े नमूद अधिसूचित केलेल्या सेवेच्या कालावधीमध्ये त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशन अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | व्दितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | इमारत नकाशे मंजूरी, अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र, तात्पुरती नळ जोडणी, सांडपाणी निस्सारण नकाशे. | ४५ दिवस | कार्यकारी अभियंता/उप अभियंता/ सहायक रचनाकार/ सहायक वास्तुशास्त्रज्ञ | संबंधित अधिक्षक, अभियंता | मुख्य नियोजक, मऔविम. |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२१०२८१५२९०२५०१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY SHAMKANT DEGAONKAR

Digitally signed by SANJAY SHAMKANT DEGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=de0a2ca7914a3c02f24aa23655f609f41f2d36b0ec57da4c71f19aaf08230a79, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=56CF8C8577584ADC42F070185C585C41084CC34F6683553D21CCACBFA33D4D1F, cn=SANJAY SHAMKANT DEGAONKAR
Date: 2022.10.28 16:20:13 +05'30'

**( संजय देगांवकर )**
सह सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन.

**प्रत :-**

१. मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव.
४. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
५. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
७. मा. लोक आयुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
९. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई.
११. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक.
१२. निवडनस्ती (उद्योग-६).

*********

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी व नियम कालमर्यादा अधिसूचित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक :- मलोह-२०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६.**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ०४ नोव्हेंबर, २०२२

**वाचा :** १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५)

२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र मलोह २०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६, दि.२३/७/२०१५.

३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र मलोह २०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६, दि.११/९/२०१८.

४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र मलोह २०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६, दि.०१/०१/२०२१

५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे पत्र क्र. एमआयडीसी/ एच क्यू/ आयटी सेल/ २०२२/ डी ५३७०५, दि. २१/१०/२०२२.

६) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र मलोह २०१५/प्र.क्र.७७/उद्योग-६, दि.२८/१०/२०२२.

७) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे पत्र क्र. एमआयडीसी/ आयएफएमएस/ आयटी सेल/२०२२/ डी ५७५४१, दि. ३१/१०/२०२२.

**प्रस्तावना:-**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५, दि.२८/४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करून त्याप्रमाणे सेवा पुरविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

२. विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये विभागामार्फत १९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून, संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये उद्योग संचालनालयाच्या दि.२३/०७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांपैकी ३ सेवा वगळण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये उद्योग संचालनालयाच्या अतिरीक्त ९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या संदर्भ क्र.५ अन्वये दि.२३/०७/२०१५ च्या शासन निर्णयातील सहपत्र “ब” मधील अनुक्रमांक १ येथील अधिसूचित केलेल्या सेवेचा कालावधीमध्ये बदल करण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने शासनाने संदर्भाधीन क्र. ६ च्या शासन निर्णयान्वये सहपत्र “ब” मधील अनुक्रमांक १ येथील अधिसूचित केलेल्या सेवेच्या कालावधीमध्ये बदल केला होता. तथापि, महामंडळाने पुन:श्च संदर्भ क्र. ७ अन्वये दि.२३/०७/२०१५ च्या शासन

निर्णयातील सहपत्र “ब” मधील अनुक्रमांक १ व ३ मध्ये नमूद सेवेच्या कालावधीमध्ये बदल करण्याची विनंती केली आहे. महामंडळाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संदर्भ क्र. ७ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि. २३/०७/२०१५ च्या शासन निर्णयातील खालील नमूद अधिसूचित केलेल्या सेवेच्या कालावधीमध्ये त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पद निर्देशन अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | व्दितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | इमारत नकाशे मंजूरी, अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र, तात्पुरती नळ जोडणी, सांडपाणी नि:स्सारण नकाशे. | ३० दिवस | कार्यकारी अभियंता/उप अभियंता/ सहायक रचनाकार/ सहायक वास्तुशास्त्रज्ञ | संबंधित अधिक्षक, अभियंता | मुख्य नियोजक, मऔविम. |
| २. | इमारत पूर्णत्व प्रमाणपत्र/ भोगवटा प्रमाणपत्र | ०८ दिवस | कार्यकारी अभियंता/उप अभियंता/ सहायक रचनाकार/ सहायक वास्तुशास्त्रज्ञ | संबंधित अधिक्षक, अभियंता | मुख्य नियोजक, मऔविम. |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२११०७१२१३४९४४१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढ़ण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY SHAMKANT DEGAONKAR

Digitally signed by SANJAY SHAMKANT DEGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=de0a2ca7914a3c02f24aa23655f609f41f2d36b0ec57da4c71f19aaf08230a79,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=56CF8C8577584ADC42F070185C585C41084CC34F6683553D21CCACBFA33D4D1F, cn=SANJAY SHAMKANT DEGAONKAR
Date: 2022.11.07 12:18:04 +05'30'

**( संजय देगांवकर )**

**सह सचिव , महाराष्ट्र शासन.**

**प्रत :-**

१. मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव.
४. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
५. सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. सर्व मा.विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
७. मा. मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.

८. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,अंधेरी, मुंबई.
१०. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मुंबई.
१२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी १/२/३/४, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१३. मुख्य अभियंता (मुख्या.), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१४. सर्व प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
१५. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक.
१६. निवडनस्ती (उद्योग-६).

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक ७०] सोमवार, मे १९, २०२५/वैशाख २९, शके १९४७ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १७९

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मे, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक मलोह-२०२४/प्र.क्र.११०/उद्योग-६.—महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई या कार्यालयांमार्फत, देण्यात येणाऱ्या १० लोकसेवा उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दिनांक २३ जुलै २०१५ आणि दिनांक ५ जानेवारी २०२१ रोजीच्या शासन निर्णयांन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१) च्या कलम ३ मधील पोट-कलम (१) अन्वये प्राप्त होणाऱ्या अधिकाराचा वापर करून उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई या सार्वजनिक प्राधिकरणामार्फत, पात्र उद्योगांना पुरविण्यात येणाऱ्या १७ लोकसेवा आणि या लोकसेवा देण्याकरिता पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी, द्वितीय अपील प्राधिकारी आणि नियतकालमर्यादा आवश्यक सुधारणेसह सोबतच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अधिसूचित करण्यात येत आहे.

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग अधिसूचना क्रमांक- क्र.मलोह-२०२४/प्र.क्र.११०/उद्योग-६ सोबतची**

# अनुसूची

**(महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिसूचित सेवांचा तपशिल)**

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | द्वितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा नळ जोडणी. | १५ दिवस | उप अभियंता (२५ मि.मि. पर्यंत ) | संबधित कार्यकारी अभियंता (२५मि.मि. पर्यंत ) | अधिक्षक अभियंता, (२५ मि.मि. पर्यंत) |
| | | | कार्यकारी अभियंता (२५ मि.मि. वरील) | संबंधीत अधिक्षक अभियंता, (२५मि.मि. वरील) मऔविम. | मुख्य अभियंता (२५ मि.मि. वरील) |
| २ | जलनिसारण जोडणी | १५ दिवस | उप अभियंता | संबधित कार्यकारी अभियंता, मऔविम. | संबंधीत अधिक्षक अभियंता |
| ३ | अंतिम अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र. | १५ दिवस | विभागीय अग्निशमन अधिकारी (१५००० चौ.मी. पर्यंत) | उप. मुख्य अग्निशमन अधिकारी | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| | | | उप. मुख्य अग्निशमन अधिकारी (१५००१ ते २५००० चौ.मी. पर्यंत) | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार |
| | | | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी (२५००१ ते ४०००० चौ.मी. पर्यंत) | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार | सह. मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) |
| | | | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार (४०,००१ चौ.मी. च्या वरील सर्व प्रकरणे) | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) | मुख्य कार्यकारी अधिकारी |

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | द्वितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| ४ | तात्पुरते पी.एन.जी. अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र | १५ दिवस | विभागीय अग्निशमन अधिकारी | उप. मुख्य अग्निशमन अधिकारी | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| | | | उप. मुख्य अग्निशमन अधिकारी | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार |
| | | | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार | सह. मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) |
| ५ | अंतिम पी.एन.जी. अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र | १५ दिवस | विभागीय अग्निशमन अधिकारी | उप. मुख्य अग्निशमन अधिकारी | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| | | | उप. मुख्य अग्निशमन अधिकारी | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार |
| | | | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार | सह. मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) |
| ६ | इमारत पुर्णत्व प्रमाणपत्र/ भोगवटा प्रमाणपत्र | १० दिवस | उप अभियंता | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता. |
| | | | कार्यकारी अभियंता. | अधीक्षक अभियंता | वरिष्ठ नगर रचनाकार. |
| | | | सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ / सहाय्यक रचनाकार. | उप वास्तुशास्त्रज्ञ / उप रचनाकार. | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ. |
| | | | उप वास्तुशास्त्रज्ञ/ उप रचनाकार/ | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ | वरिष्ठ नगर रचनाकार |
| | | | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ | वरिष्ठ नगर रचनाकार | मुख्य नियोजक |
| ७ | इमारत नकाशे मंजूरी व तात्पुरते अग्निशमन ना | ३५ दिवस | उप अभियंता | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता. |

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | द्वितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | हरकत प्रमाणपत्र | | कार्यकारी अभियंता. | अधीक्षक अभियंता. | वरिष्ठ नगर रचनाकार. |
| | | | सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ/ सहाय्यक रचनाकार | उप वास्तुशास्त्रज्ञ/ उप रचनाकर | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ |
| | | | उप वास्तुशास्त्रज्ञ/ उप रचनाकार. | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ. | वरिष्ठ नगर रचनाकार |
| | | | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ | वरिष्ठ नगर रचनाकार | मुख्य नियोजक |
| | | | विभागीय अग्निशमन अधिकारी (१५००० चौ.मी. पर्यंत) | उप. मुख्य अग्निशमन अधिकारी | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी |
| | | | उप. मुख्य अग्निशमन अधिकारी (१५००१ ते २५००० चौ.मी. पर्यंत) | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार |
| | | | सह. मुख्य अग्निशमन अधिकारी (२५००१ ते ४०००० चौ.मी. पर्यंत) | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार | सह. मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) |
| | | | मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार (४०,००१ चौ.मी. च्या वरील सर्व प्रकरणे) | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ८ | मुंबई प्रदेश महानगरमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सह मुख्य कार्यकारी अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | द्वितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | माहिती तंत्रज्ञान कंपन्याना माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत इरादापत्रे | | | (मुख्यालय) | |
| ९ | मुंबई प्रदेश महानगर प्रदेशामधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत कंपन्यांची नोंदणी करणे. | १० दिवस | तांत्रिक सल्लागार | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १० | ऑनलाईन सरळ पध्दतीने अथवा प्राधान्याने भूखंड वाटप करताना समितीच्या मंजूरीनंतर जागेचे देकार पत्र (offer letter) देणे / ऑनलाईन निविदा पध्दतीने भूखंडाचे वाटप करताना निविदा उघडणा-या समितीच्या अहवालास मुख्य कार्यकारी यांची मंजुरी प्राप्त अहवाल प्रा.अ. यांना प्राप्त झाल्यावर जागेचे देकार पत्र देणे. | २ दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |
| ११ | भूखंडाचे वाटप पत्र (Allotment letter) देणे. | इसारा रक्कम भरल्यानंतर ७ दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |
| १२ | गहाण समंती पत्र | १५ दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |
| १३ | अंतिम भाडेपट्टी करार (Final lease agreement) | ३० दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |
| १४ | पुर्व निर्धारीत भाडेपट्टी करार (Pre - determined lease agreement) | ३० दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |
| १५ | औद्योगिक प्रयोजनात बदल (Change in industrial activity) | २१ दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्याची कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | द्वितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १६ | डीड ऑफ असाईनमेंट (Deed of Assignment) | ३० दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |
| १७ | वृक्षतोड / वृक्ष पुर्नरोपण/छाटणी. | ४५ दिवस | उप अभियंता | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता |
| | | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता. | वरिष्ठ नगर रचनाकार |
| | | | सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ/ सहाय्यक रचनाकार | उप वास्तुशास्त्रज्ञ/ उप रचनाकार | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ |
| | | | उप वास्तुशास्त्रज्ञ/ उप रचनाकार. | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ. | वरिष्ठ नगर रचनाकार |
| | | | सहयोगी रचनाकार/ सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ. | वरिष्ठ नगर रचनाकार | मुख्य नियोजक |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित सासुलकर,**
शासनाचे उप सचिव (उद्योग).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.